| MHKO100009922018 | **नियमीत दिवाणी दावा क्र. २१२/२०१८**<br><br>रुकव्वा चंद्रकांत कांबळे वगैरे.<br>विरुध्द<br>शिवरुप ईराप्पा कांबळे वगैरे. |
|---|---|

## निशाणी क्र.२८ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२अ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीतर्फे सदर अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादींना दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.२अ यांना दि. ०३/०१/२०१९ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे व त्यांचेविरुध्द दि. ०४/०४/२०१९ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र.२अ यांनी प्रस्तुतचा अर्ज दि. ०४/०१/२०२३ रोजी दाखल केलेला आहे. मुदतीचा कायदा कलम ५ प्रमाणे विलंबासाठी संयुक्तीक कारण नमुद करणे आवश्यक असते.

०३. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केलेले आहे की, प्रस्तुत कामात प्रतिवादी क्र.२अ यांचेविरुध्द विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला होता. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.२अ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होऊन मिळणेकरीता नि.२६ येथे अर्ज दाखल करण्यात आला. सदरचा नि.२६ चा अर्ज रक्कम रु. ५००/- च्या खर्चासह मंजुर करण्यात आला. परंतु, प्रतिवादी क्र.२अ आजारी असल्याने व आर्थिक तडजोड न झाल्याने तसेच वकीलांना वेळेत न भेटल्याने नि.२६ वर झालेली खर्चाची रक्कम रु.५००/- न्यायालयात न भरु शकल्यामुळे मे. न्यायालयाने नि.२६ वर पारीत केलेला आदेश नि.१ वर आदेश पारीत करुन रद्दबातल ठरविणेत आला आहे

अशी कारणे नमूद केलेली आहेत. प्रत्यक्षात सदर कारणे व प्रतिवादी हजर झाल्याचा काळ विचारात घेतले असता, सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादी यांना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांना त्यांची कैफियत सादर करु देणे मला योग्य वाटते. वर नमुद प्रमाणे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज ब-याच विलंबाने दाखल केलेला असल्याने प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.१,०००/- (रुपये एक हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.03.03 17:34:14 +0530

**(एस.ए.राठोड)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०२/०३/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 02/03/2023 |
| Order signed by P.O. on | 02/03/2023 |
| Order uploaded on | 03/03/2023 |